CNR No. - MHSI080003062026

## निशाणी ०१ वरील आदेश

अर्जदार हिने सदरचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायद्याच्या कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**अर्जदाराच्या अर्जाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः-**

२. अर्जदार दिनेश वामन राजापूरकर हे मयत सुनिता वामन राजापूरकर यांचे पुत्र आहेत. मयत सुनिता वामन राजापूरकर यांचे दि.०५/०८/२०२२ रोजी मुंबई येथे निधन झाले आहे. मयत सुनिता वामन राजापूरकर यांच्या नावे मौजे कणकवली येथील कणकवली नगरपंचायत हद्दीतील मालमत्ता क्र.२/४५८अ (६२) अशी निवासी सदनिका आहे. सदर मालमत्ता अर्जदार यांच्या नावाने नोंद करण्यासाठी अर्जदारांनी कणकवली नगरपंचायतीकडे अर्ज केला असता, संबंधित कार्यालयाने दि.३०/०३/२०२६ रोजीच्या पत्राद्वारे सक्षम न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले. मयत सुनिता वामन राजापूरकर यांचे पश्चात अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असून त्यांच्याशिवाय अन्य कोणताही कायदेशीर वारस नसल्याचे अर्जदारांनी नमूद केले आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज दाखल करण्यात आला आहे. अर्जदारांच्या विद्वान वकिलांनी युक्तिवाद केला की, अर्जदार हेच मयत सुनिता वामन राजापूरकर यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांच्या नावाने वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

३. न्यायालयाने अर्जदारामार्फत दैनिक प्रहार या वर्तमानपत्रामध्ये दि.२३/०४/२०२६ रोजी निशाणी क्र.९ प्रमाणे जाहिर प्रगटन प्रसिद्ध करून हरकती मागविल्या होत्या. तथापि, सदर जाहिर प्रगटन प्रसिद्ध होऊनदेखील कोणत्याही व्यक्तीने अर्जास हरकत घेतलेली नाही.

४. अर्जदार दिनेश वामन राजापूरकर यांनी त्यांचा पुरावा निशाणी क्र.११ प्रमाणे दिला आहे. त्यांनी पुराव्यात अर्जाशी सुसंगत अशी कथने केली आहेत. अर्जदारांच्या तोंडी पुराव्यास निशाणी क्र.१२ वरील कणकवली नगरपंचायत यांचे पत्र, निशाणी क्र.१३ वरील पोलीस पाटील यांचे प्रमाणपत्र, निशाणी क्र.१४ वरील मालमत्ता नोंद उतारा तसेच निशाणी क्र.१८ वरील सुनिता वामन राजापूरकर यांचे मृत्यू प्रमाणपत्र हा पूरक पुरावा आहे.

५. निशाणी क्र.९ चे जाहिर प्रगटन प्रसिद्ध करूनदेखील कोणत्याही व्यक्तीने अर्जास हरकत घेतलेली नाही. अर्जदार यांनी दिलेला तोंडी पुरावा तसेच दाखल केलेली कागदपत्रे व त्यावरील पुरावा यांवरून सुनिता वामन राजापूरकर यांचे दि.०५/०८/२०२२ रोजी निधन झाले असल्याचे सिद्ध होते. निशाणी क्र.१३ वरील पोलीस पाटील यांच्या प्रमाणपत्रावरून अर्जदार दिनेश वामन राजापूरकर हे मयत सुनिता वामन राजापूरकर यांचे पुत्र असल्याचे दिसून येते. तसेच निशाणी क्र.१४ वरील मालमत्ता नोंद उताऱ्यावरून कणकवली नगरपंचायत हद्दीतील मालमत्ता क्र.२/४५८अ (६२) ही निवासी सदनिका मयत सुनिता वामन राजापूरकर यांच्या नावे असल्याचे दिसून येते. निशाणी क्र.१२ वरील कणकवली नगरपंचायतीच्या पत्रावरून सदर मालमत्ता अर्जदार यांच्या नावाने नोंद करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याचे स्पष्ट होते. अर्जदार हेच मयत सुनिता वामन राजापूरकर यांचे कायदेशीर वारस असल्याचे उपलब्ध पुराव्यावरून स्पष्ट होते. त्यामुळे अर्जदारांनी केलेला अर्ज सिद्ध झालेला असून अर्जदार वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सबब, अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**:: आदेश ::**

1. अर्ज मंजूर करण्यात येतो.
2. अर्जदार दिनेश वामन राजापूरकर हे मयत सुनिता वामन राजापूरकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत त्यांना वारस प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) देण्यात यावे.
3. सदर प्रमाणपत्र अपेंडीक्स – बी प्रमाणे देण्यात यावे.
4. अर्जदारांनी नियमाप्रमाणे लागणारी कोर्ट फी न्यायालयात जमा करावी.

SHUBHAM GOVIND LATURIYA

Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2026.07.28 16:27:46 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

( शुभम जी. लटुरिया )

दिनांकः२८/०७/२०२६

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
कणकवली.